साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## घड्याळाची प्रचारात आघाडी, तुतारीची नुसतीच हवा..!

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी विधानसभेसाठीचे मतदान काहीच दिवसांवर येऊन ठेपले असून या निवडणुकीसाठी आमदार धनंजय मुंडे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. निवडणुकीसाठी विक्रमी मताधिक्य मिळावे म्हणून महायुतीच्या नेते, कार्यकर्त्यांनी जोरदार 'फिल्डींग' लावली आहे तर महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांच्या तुतारीची मतदार संघात मोठी हवा असून 'फिल्डींग' मात्र अपुरी आहे.



परळी विधानसभेच्या निवडणुकीसाठी आकरा उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी महायुतीचे विद्यमान आमदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यातील प्रमुख नेते धनंजय मुंडे व महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट सरळ लढत होत आहे. या निवडणुकीत यश मिळवण्यासाठी या दोन्हीही उमेदवारांनी मोठी प्रतिष्ठा लावली आहे. सुरूवातीपासून श्री मुंडे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. महायुतीचे कार्यकर्ते श्री मुंडे यांना या निवडणुकीत विक्रमी मताधिक्य मिळावे म्हणून जीवाचे रान करत आहेत प्रचार फेऱ्या, बैठकांचा धडाका सुरू असून मतदारांशी थेट संपर्क साधला जात आहे. युतीचे नेते, कार्यकर्ते घड्याळाला अधिकाधिक मतदान व्हावे म्हणून नियोजन करत आहेत. भाजपच्या जेष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांनी रविवारी (ता.१०) परळीत दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमातून भाजपचे नेते, कार्यकर्ते यांच्याशी थेट संवाद साधला असून आमदार धनंजय मुंडे यांना परळीतून विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांना कामाला लावले आहे. घड्याळाला मोठे मताधिक्य मिळावे यासाठी कोणत्याच गोष्टीची उणीव राहू नये म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या तुतारीची मतदार संघात जोरदार हवा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या शनिवारी (ता.९) परळीत झालेल्या प्रचाराच्या जाहीर सभेनंतर चित्र पालटले असून कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले



आहेत. असे असले तरी महाविकास आघाडीचे अनेक नेते अद्याप प्रचारासाठी रस्त्यावर उतरलेले दिसत नाहीत श्री पवार यांच्या सभेत मोठ्या डरकाळ्या फोडणारे अनेकजण तुतारीला मते मिळावीत म्हणून काहीच करत नसल्याचे दिसते आहे. बंद खोलीतच त्यांचे चर्चेचे गुऱ्हाळ चालू आहे. तुतारीला मतदान करुन घेण्यासाठी अद्याप कोणतीही यंत्रणा लावलेली दिसत नाही की पुरेशी तयारीही दिसत नाही. निवडणुकीचा प्रचारही घड्याळा एवढा नाही. आता केवळ नऊ दिवस उरले असून राजेसाहेब देशमुख यांना विजयी करण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते कशी 'फिल्डींग' लावतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**मतदान काही दिवसांवर येऊन ठेपल्याने परळीत गल्लीबोळात घड्याळ व तुतारीच्या प्रचाराचे सायकल रिक्षे, रथ फिरत आहेत. एक गेला की दुसरा येतो आहे. यामुळे या निवडणुकीत रंग भरत आहे.**

## जामीनावर व तडीपार असणाऱ्या आरोपींना बुथ केंद्राच्या परिसरात प्रतिबंद करा-बहादूरभाई

परळी (बातमीदार):- नुकत्याच संपन्न झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत वेगवेगळ्या गंभीर केसेस मध्ये जामीनावर व तडीपार असणाऱ्या आरोपी कडुन मतदान केंद्रात मतदान करतांना दबाव, धमकी, बोगस मतदान करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाच्या तक्रारी मतदार व्यक्त करत असल्याची माहिती समोर आहेत. विधानसभा निवडणुकीत असेच काही प्रकार घडु शकतात म्हणून या सर्व गंभीर गुन्हात जामीनावर व तडीपार म्हणून बाहेर असलेल्या व्यक्तीना मतदान केंद्र परिसरच्या १०० मीटर च्या आत येण्यास प्रतिबंद करावा अशी मागणी परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी वतिने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे कि, विधानसभा निवडणूक २०२४ अन्वे परळी विधानसभा क्र २३३ हे अती संवेदनशील असून मागील लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये काही मतदान केंद्रावर गंभीर व अट्टल गुन्हेगार जे जामीन वर बाहेर आहेत त्यांनी बूथवर स्वतः बसून राहून लोकाना मतदान त्यांच्या महणण्या नुसार लोकाना बटन दाबवणस भाग पडले, दाबवण्यास नकार दिल्यास त्याचे बटन त्यांनी स्वतः दाबून मतदान केले आहे त्याचा पुरावा लोकसभा निवडणूक २०२४चे बूथ क्र. १३२ आणि १३३ चे रेकॉर्ड पाहिल्यास आपणास दिसून येईल तेव्हा मे. साहेबना नम्र विनंती पूर्वक अर्ज करण्यात आला आहे कि, विधानसभा निवडणूक २०२४ अन्वे होत असलेले परळी मतदार संघ क्र.२३३ मधील बूथ क्र. १४१,१४२, आणि १४३ या बूथवर येतील अट्टलगुन्हेगार ज्यांच्या वर अनेक गंभीर गुन्हे आहेत, चोरी हाफ मर्डर, गुटका तस्करी इत्यादी असून ते जामीन वर बाहेर असून ते मतदान केंद्रावर तेथच उभे राहून मतदारांवर दबाव टाकून बळजबरीने त्यांच्या समर्थक उमेदवारास मतदान करून घेतानाचे प्रकार घडले आहेत.अश्या या व्यक्तीना मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसर मध्ये मतदान करण्या व्यतरिकीत प्रवेश देण्यात येऊ नये जेणे करून त्या बूथवरील मतदान निपक्ष आणि भयमुक्त मतदान होईल.संबंधित निवडणूक निरिक्षकांनी अर्जाची योग्य दखल घेऊन योग्य कार्यवाही करावी ही विनंती परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केली आहे. ***

## दिवाळीनिमित्त शंकरपार्वतीनगर मित्र मंडळाच्या वतीने सेवा देणाऱ्यांचा सत्कार



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील अंबाजोगाई मार्गावरील शंकर पार्वती नगर मित्र मंडळातर्फे गल्लीला सातत्याने अत्यावश्यक सेवा देणारे शासकीय, निमशासकीय व खासगी कर्मचारी यांचा दिपावलीनिमित्त सत्कार करून दिवाळी भेट देण्यात आले.

शंकर पार्वतीनगर भागातील मारोती मंदिराच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजाराम मुंडे, डॉ.दिनेश लोढा, इंजि.अतुल रोडगे यांच्यासह वसाहतीतील मित्र मंडळाचे सदस्य सुखदेव यादव, एच.एल.डांगे, विजय देशमुख, अजित देशमुख, शंकर कापसे, शाम तपके आदींसह इतर नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजक शामराव तपक यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले. त्यांच्या हस्ते गल्लीत सेवा देणारे पोस्टमन, लाईनमन, स्वच्छता कर्मचारी, रात्री गस्त घालणारे वॉचमन, पाणी व गॅस वितरक, सेवा देणारे रिक्षा चालक, स्कूल बस चालक घर कामगार महिला, पुरूष आदींचा यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन संजय सुरवसे यांनी केले. या कार्यक्रमासाठी नगर मित्र मंडळाचे प्रमोद परळीकर, सुखदेव यादव (माजी सैनिक) शामराव तपके, बाबासाहेब मुठाळ, दिलीपराव देशमुख, आत्माराम मुंडे, नारायण फुलारी, विकास मुंडे, विक्रम अंबेगावकर, वसंत राठोड, विजय देशमुख आदी मान्यवरांनी सहकार्य केले. ***

## वाचनीय व दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा 'परळी परिसर'ने जपली-प्रा.बाबासाहेब देशमुख

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- वाचनीय व दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा सा.परळी परिसरने जपली आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व श्री वैजनाथ देवस्थान संस्थेचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख यांनी केले.

परळी वैजनाथ येथून गेल्या आठ वर्षापासून नियमित प्रकाशित होणाऱ्या सा.परळी परिसरच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन नुकतेच संपर्क कार्यालयात करण्यात आले. यावेळी प्रा.देशमुख बोलत होते. कार्यकारी संपादक लक्ष्मण वाकडे, पत्रकार प्रकाश चव्हाण, दत्ता शिवगण आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत श्री वाकडे यांनी केले. सा.परळी



परिसरचा हा आठवा दिवाळी अंक असून या अंकात राजकीय, सामाजिक विषयांसह लेख, कथा, कवीता आहेत. डिजीटल छपाईचा हा अंक असून दर्जेदार दिवाळी अंक काढण्याची परंपरा परळी परिसरने कायम जपली आहे असे सांगून परळी परिसरच्या माध्यमातून उत्कृष्ट दिवाळी अंक वाचकांना उपलब्ध करून दिला आहे असेही प्रा.देशमुख म्हणाले. आभार प्रदर्शन श्री वाकडे यांनी मानले. ***

## मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

बीड, (जिमाका) : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार, २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. या दिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवावेत, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत. बीड तालुक्यातील चौसाळा, गेवराईतील गेवराई, गुळज, मारफळा, राजपिंप्री, मालेगाव खु., किनगाव, शिरूर कासारमधील जाटनांदूर, मातोरी, पाटोद्यातील पिठ्ठी, आष्टी तालुक्यातील पिंपळा, दौलावडगाव, खडकत, आष्टा ह.ना. केरूळ, डोईठाण, हातोला, माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी, एकदरा, गंगामसला, माजलगाव, वडवणी तालुक्यातील वडवणी, अंबाजोगाईतील लोखंडी सावरगाव, केजमधील लव्हुरी, बोरगाव बु., परळी तालुक्यातील पोहनेर, नागापूर याठिकाणी मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार अन्य दिवशी भरवावेत, असेही आदेशात नमूद आहे. ***

# स्व.पंडितअण्णांच्या काळात बाजार समितीने घेतलेल्या १०० एक्कर जमिनीवर परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क - आ.धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- स्वर्गीय पंडितअण्णा मुंडे हे परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असताना त्यांनी बाजार समितीच्या नावे विकत घेतलेल्या १०० एकर जमिनीवर परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क आहे, व्यापारपेठेची वृद्धी करताना ही जमीन अत्यंत अल्प दरात व्यापारी बांधवांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे मत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत बोलताना व्यक्त केले आहे.

मंगळवारी सायंकाळी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी तालुक्यातील व्यापारी बांधवांचा दीपावली निमित्त स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या कार्यक्रमात धनंजय मुंडे बोलत होते.

काहीजण जाणीवपूर्वक परळीत दहशत दादागिरी म्हणून, व्यापाऱ्यांना अडचण म्हणून नेहमीच परळीची बदनामी करत आहेत. मात्र खरोखर परळीत व्यवसाय करणाऱ्या लहानात लहान व्यापाऱ्यापासून ते मोठ्या व्यवसायिकांपर्यंत कुणालाही कधीही जाऊन भेटा आणि विचारा मी किंवा माझ्या सहकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा त्रास त्यांना आहे का? मी परळीत मोठ मोठे महोत्सव घेतले माझ्या

## परळीत धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत व्यापारी स्नेह मिलन संपन्न



नाद प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्याचा खर्च केला परंतु परळीतील एकाही व्यावसायिक बांधवांकडून कधी एक रुपया सुद्धा वर्गणी मागितलेली नाही असेही यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना स्पष्ट केले.

सिरसाळा येथे २२०० एकर जागेमध्ये एमआयडीसी उभारण्यास मंजुरी मिळाली आहे त्यापैकी ७८ हेक्टर जमीन अधिग्रहण करण्यात आली असून या भागात उद्योग उभारणीसाठी पोषक पूरक सुविधा उपलब्ध केल्या जातील. तसेच इथे येणाऱ्या उद्योजकांना अत्यंत स्वस्त दरात ही जमीन उपलब्ध करून द्यावी लागेल तेव्हाच मोठे उद्योग या ठिकाणी आकर्षित होतील. आगामी काळात हे देखील पूर्ण करून आंबेजोगाई, परळी, शिरसाळा ते दिंद्रुड पर्यंत उद्योगांचे जाळे उभे राहील असा व्यापार व उद्योग क्षेत्रात भरारी घेण्याचा मानस असून त्या दृष्टीने मी नियोजन करत आहे असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

मला स्वतः:ला कोणताही उद्योग व्यवसाय करण्यात किंवा संस्था उभारण्यात रस नाही, मलनाथपूर भिलेगाव परिसरात २५० एकर जमिनीवर शापूरजी पालनजी या सुप्रसिद्ध कंपनीला सोलार पार्क उभा करून दिला त्या ठिकाणी हजारावर रोजगारांची निर्मिती ही झाली आणि ८० मेगावाट २१ निर्मिती केली जात आहे. २००६-७ सालापासून न्यायालयीन लढा देऊन इंडिया सिमेंट फॅक्टरी परळीत उभी केली, पुढे अल्ट्राटेक कंपनी सुद्धा आता परळीत ६०० कोटींची गुंतवणूक करण्यास मान्य झाले असून तसा करारही करण्यात आला आहे. मात्र हे सगळे आपल्या विरोधकांना दिसणार नाही. फक्त परळीची आणि परळीच्या मातीची बदनामी करण्याचा एक कलमी कार्यक्रम त्यांचा आहे. त्यांना आता आपण सर्व परळीकरांनी मिळून धडा शिकवला पाहिजे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.

**...तर माझ्या जागेत मेडिकल कॉलेज व दवाखाना उभारून देतो-** माझ्या घराजवळ १६ एकर जागा शिल्लक आहे त्यापैकी १५ एकर जागा देतो कोणीही वैद्यकीय क्षेत्रातील मोठ्या व्यक्तीने पुढे यावे त्यांना ट्रस्ट तयार करून त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज व सर्व अध्ययवत वैद्यकीय सुविधा असलेले रुग्णालय सुरू करून देतो. त्यासाठी लागणारे अर्थसहाय्यही कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देतो. मला त्यातून एक रुपयाच्या कमाईची अपेक्षा नाही अट फक्त एकच आहे की त्या रुग्णालयात परळी मतदारसंघातील गोरगरिबांची मोफत उपचारांची सुविधा झाली पाहिजे तसेच मेडिकल कॉलेजमध्ये मतदारसंघातील पात्र विद्यार्थ्यांना अत्यंत अल्प दरात प्रवेश मिळाला पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले. या स्नेह मेळाव्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, माऊली तात्या गडदे, जयपाल लाहोटी, मनीष झंवर, सतीश करमाळकर, सुशील डुबे, गोल्डीशेठ भाटिया, जगदीश चौधरी, अंबादास सुगावे, तसेच माऊली दादा फड, विजय सामत, शांतीलाल जैन, संदीप लाहोटी, बंडूशेठ गरुड, देवसटवार काका, विनोद शेठ सामत, नंदकिशोर विभा, सुभाष शेठ तोतला, पांडुरंग लाहोटी, गुलाबराव शेटे, विजय वाकेकर, अशोक कांकरिया, अनिल तांदळे, रतन कोठारी, राजगोपाल बंग, केदार सारडा, संजय दरक, सुनील कोटेचा, नवरतन शर्मा, लक्ष्मण मुंडे यांसह परळी शहर व तालुक्यातील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचार रॅलीला परळीत मोठा प्रतिसाद

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष, कॉंग्रेस, शिवसेना, उबाटा, महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी शहरात दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी परळी शहरात ठीक ठिकाणी प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदार बंधू भगिनींना परळी शहरातील विविध समस्या सोडविण्यासाठी मला मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी मतदारांना केले. रॅलीस नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, परळी शहर कॉंग्रेस चे सर्व पदाधिकारी महिला आघाडी, युवक कॉंग्रेस, सर्व सेल, सर्व फ्रंटचे कार्यकर्ते यांनी दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी



सकाळी १० वा. महाविकास आघाडी चे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत गणेशपार ते धनगर गल्ली, बंगला, आयेशा कॉलनी, मोमदिया कॉलनी आदी परिसरामध्ये प्रचार फेरी काढण्यात आली होती. रॅलीमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मतदान रुपी आशीर्वाद देऊन सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन मतदार बंधू भगिनींना केले.

या रॅलीत वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बहादूर भाई, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष जीवनराव देशमुख, डॉ. दुष्यंत देशमुख, शशीशेखर चौधरी, कॉ. उत्तम माने, बाबा शिंदे, सय्यद फिरोज, शिवाजी देशमुख, रणजीत देशमुख, दीपक शिरसाट, सुनील मस्के, बद्रभाई, सद्दाम शेख, रसूल खान, इतेशामा खतीब, सुभाष देशमुख, गफार शहा, वैजनाथ गडेकर, जावेद भाई, मजहर बाबा शेख, अबूतला आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीस मतदार बंधू भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# राजेभाऊ तू काळजी करू नको, मी आहे..!

## शरदचंद्र पवार यांचा राजेभाऊ फड यांना ऊर्जादायी शब्द

परळी वैजनाथ (बातमीदार):- राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी वैजनाथ येथे भव्य जाहीर सभा घेतली. परळी विधानसभा मतदारसंघातील जनतेने या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुपारच्या सुमारास त्यांचं परळीत आगमन झालं. यावेळी युवक नेते राजेभाऊ फड यांनी हेलिपॅडवर उपस्थित राहून त्यांचे स्वागत केले. यावेळी शरदचंद्र पवार यांनी राजेभाऊ फड यांचा हात पकडत म्हटले की, ''राजेभाऊ तू संघर्ष करत रहा, काळजी करू नकोस मी आहे...'' असा विश्वास दिला.

देशाचे नेते, जाणते राजे



शरदचंद्र पवार महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ परळी वैजनाथ शहरात आले होते. त्यांचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी स्वतः हेलिपॅडवर उपस्थित राहून प्रभू वैद्यनाथ यांच्या पावन भूमीत स्वागत केले. यावेळी पवार साहेबांनी थोड्याच शब्दांत मोठी ऊर्जा दिली आणि मार्गदर्शन केले. ते मला म्हणाले... ''राजेभाऊ तुमच्यासारख्या तरुण तडफदार नेतृत्वाची आजच्या समाजाला गरज आहे. काम करत रहा ही जनता जनार्दन तुम्हाला नक्कीच एका मोठ्या उंचीवर नेऊन ठेवेल. निष्ठेला आणि कामाला निश्चित फळ मिळत असते. तुम्ही लोकांच्यासाठी संघर्ष करत रहा, लोकसेवा करत रहा मी तुमच्या पाठीशी मोठी ताकद लावणार आहे. भविष्यात लवकरच तुमच्यावर एक मोठी जबाबदारी मी टाकून लोकांच्या सेवेसाठी तुम्हाला मी मैदानात उतरवणार आहे.'' साहेबांच्या या शब्दांमुळे मला आता कसलीही काळजी उरलेली नसून मी त्यांचा विचार तळागाळातील जनतेपर्यंत नेण्यासाठी सदैव कार्यरत राहीन असे राजेभाऊ फड मध्यम प्रतिनिधींशी बोलतांना म्हणाले. ***

# युवा नेते सुनील गुट्टे यांनी श्री पवार यांच्या सभेत केलेल्या भाषणाची परळी विधानसभा मतदार संघात चर्चा

परळी (बातमीदार):- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खा शरदचंद्रजी पवार साहेब यांची परळी विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचार सभेसाठी परळी मोंढा मार्केट येथे सभा आयोजित करण्यात आली होती या एकाच सभेने परळी मतदार संघाचे वारे फिरले असून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचा विजय निश्चित मांडल्या जात आहे या सभेमध्ये परळी विधानसभा मतदारसंघाचे



युवक नेते सुनील भैया गुट्टे यांचे प्रस्ताविक पर भाषण झाले या भाषणाची चर्चा सध्या प्रत्येक ठिकाणी होताना दिसत आहे. युवक नेते सुनील गुट्टे यांनी मागच्या काही दिवसांपूर्वी परळी मतदारसंघात शेतकरी संवाद यात्रा आयोजित केली होती या संवाद यात्रेत जवळपास पंधरा दिवस मुक्काम ग्रामीण भागात करून ग्रामीण भागातल्या शेतकरी कष्टकरी गाव खेड्यातला शेवटच्या घटकातला माणूस या सर्वांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या सभेमध्ये झालेल्या त्यांच्या भाषणांमध्ये परळी मतदारसंघातील वेगवेगळ्या विषयावर त्यांनी मांडणी केली त्यामध्ये पीक विमा, शेतकऱ्यांचं अनुदान, बेरोजगारी, शेतमालाचे घसरलेले भाव, महागाई तसेच परळी मध्ये गुंडागर्दी दहशत भ्रष्टाचार खोटे गुन्हे या वेगवेगळ्या विषयाला त्यांनी हात घालून साहेबांच्या समोर परळी मतदारसंघाची सध्या असलेली परिस्थिती मांडली यामुळे आज परळी मतदारसंघात गावागावात चावडीवर, पारावर , ओट्यावर, शहरातील गल्लो गल्ली चौका चौकात होत असलेल्या चर्चेमुळे सुनील गुट्टे यांनी प्रास्ताविक पर केलेल्या भाषणाची मतदारसंघात विशेष चर्चा होत आहे. ***

# जनसेवेचा ध्यास व लोक कल्याणाचा हव्यास असणारे नेते : मा.बाबासाहेब पाटील

सनातन हिंदू धर्मात अशी मान्यता आहे की, कोणत्याही दोन व्यक्ती एकमेकांना भेटणे हा योगायोग नसून ती एक ऋणानुबंधाची भेटगाठ असते.गेल्या कांही दिवसापूर्वी मला याची पुनःश्च प्रचिती आली आहे. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी जेव्हां मी स्पर्धा परीक्षा पास झालो होतो, तेव्हां साधारण ओळख असलेले तत्कालीन आमदार बाळासाहेब जाधव यांनी मला सहकार्य केल्यामुळे मी अंमलबजावणी संचालनालयात अधिकारी झालो होतो. व आजही माझे मुलाचे कामासाठी त्यांचे पुतणे मा. बाबासाहेब पाटील विद्यमान आमदार महोदय यांची भेट घ्यावी लागली. यास डबल ऋणानुबंधाची भेटगाठ असेच म्हणावे लागेल.काळ झपाट्याने पुढे सरकत असला तरी स्मृतीशेष कधीच संपत नाहीत. ते कोणत्या तरी प्रसंगातून पुन्हा पुन्हा उजागर होवून जीवन पटलावर दत्त म्हणून हजर होतात.

पाच ऑक्टोबर दोन हजार चोवीस रोजी प्रथमच मा. बाबासाहेब पाटील यांना त्यांचे वित्तीय आस्थापनेत मुलास नौकरी मिळावी म्हणून भेटण्याचा योग आला. व त्यांचे मार्मिक परंतू आश्वासक संवाद यामुळे मला ती भेट संस्मरणीय वाटली. त्याचे असे झाले की, मुलास त्यांचे बँकेत नौकरी मिळावी म्हणून लिपिक अथवा विधी सहाय्यक पद मिळावे म्हणून लेखी अर्ज घेऊन त्यांचेकडे गेलो होतो. परंतू त्यांनी अर्जाचे अवलोकन करून लिपिक किंवा विधी सहाय्यक यापैकी कोणते तरी एकच पद निवडा व तशी सेवा योजन कार्यालयात नोंद करून अर्ज करा. म्हणजे निर्णय प्रक्रिया सोपी होईल असा अभिप्राय दिला. जायचे अहमदपूरला व प्रवास हाडोळतीचे दिशेने केला तर इच्छित ठिकाण कधीच भेटणार नाही. असे विनोदाने नमूद करून त्यांनी मला अचूक मार्गदर्शनही केले. व त्यांचे या आपुलकीचे स्वभावामुळेच मी त्यांचे व्यक्तिमत्वावर आकृष्ट होवून आज व्यक्त होत आहे. शिरूर ताजबंद ता. अहमदपूर हे बाबासाहेब व त्यांचे काकाशी बाळासाहेब जाधव पाटील यांचे जन्मस्थान मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखले जात होते. माझी लहान बहीण बेलूर येथे विवाहित होवून आल्यामुळे १९७२ पासून मी या परिसरात येत असल्याने हा भाग मला परिचित आहे. बहिणेचे गावाला जाताना शिरूर ताजबंद येथील चौरस्त्यावर उतरून आम्ही बेलूरला जात होतो. कालांतराने बाळासाहेब उदगीर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले व शिरूरचे भाग्य उजाडले. बाळासाहेबांनी या गावचा चेहरा मोहरा बदलून तेथे सर्व पायाभूत सुविधा निर्माण केल्या. गावात बस स्थानक, नागरी रुणालय व सिंचनासाठी गावाभोवती पाझर तलाव आणि शेततळी निर्माण करून गावाचा कायापालट केला.त्यानंतर त्यांनी बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमातून कला वाणिज्य महाविद्यालय, अध्यापक पदवीका व पदवी महाविद्यालय सुरु करून गावात शिक्षण पंढरीचा ज्ञानामृतयोग जुळवून आणला. पुढे बाबासाहेब यांनीही उरली सुरली कामे करवून घेतली व गावाला महाराष्ट्राचे नकाशावर ठळकपणे प्रगट केले. आज शिरूर ताजबंद येथे आधुनिक पद्धतीचे संगणक शिक्षण, अद्यावत बाजारपेठ, उपहार गृहे व प्रगत रुग्णसेवा मिळत आहेत. गावातील नागरिक व शेतकरी आणि व्यापारी यांची आर्थिक प्रगती होवून ते सर्वजण पूर्वीपेक्षा स्वावलंबी झाले आहेत. जेथे आपण जन्मलो त्या भूमिचे आपल्यावर ऋण असते व त्याचा कांही अंशी का होईना आपण परतावा करावा लागतो. या भूमिकेतून काका पुतणे यांनी शिरूरचे नंदनवन केले आहे. शिरूर येथे महावितरण कंपनीचे उपविभागीय कार्यालय व ३३ के. व्ही. उपकेंद्र असून पूर्वी येथे सिमेंट पोल निर्मितीचा प्रकल्प देखील कार्यरत होता. शिरूरचे या क्रांतिकारी व अनुकरणीय विकासाबद्दल काका-पुतणे उभय पाटील आजी माजी आमदार महोदय अभिनंदनास पात्र आहेत.

बाबासाहेब पाटील व कुटुंबियांनी बहुजन समाजातील मुले शिकून मोठी व्हावीत. तसेच त्यांना अंशत: का होईना नौकरीचा लाभ व्हावा म्हणून शाहू शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व नोंदणी करून अहमदपूर, उदगीर व चाकूर तालुक्यात शिक्षण संस्था उभा केल्या. शिक्षणाची सोय झाल्याने ग्रामीण भागातील मुला मुलींना अन्य ठिकाणी जावून शिक्षण घेण्याचा त्रास वाचला व यामुळे कमी खर्चात पदवीधर होण्याचे स्वप्न पुर्ण झाले. वैद्यकीय व देशी आयुर्वेदाचा प्रसार आणि परंपरागत देशी उपचार पद्धतीचे संवर्धन व्हावे म्हणून उदगीर येथे धनवन्तरी आयुर्वेदिक महाविद्यालय उघडण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे परिसरातील मुलांना वैद्यकीय शिक्षणाची सोय झाली. याशिवाय शेतकरी बांधवांचा ऊस नजीकचे साखर कारखान्यात गाळपासाठी जावून नगदी रक्कम प्राप्त व्हावी म्हणून सिद्धी शुगर कारखाना चालविण्यासाठी घेतला. व त्याचे अध्यक्षपद त्यांनी स्वतः स्वीकारून सर्व यंत्रणा सक्षमपणे राबवून कारखाना उत्तमपणे हाताळला आहे. सर्व गोष्टीचे सोंग घेता येते पण पैशाचे सोंग घेता येत नाही. या बाबीचे गांभीर्य ओळखून अहमदपूर व परिसरातील मतदार बंधू भगिनींना वित्तीय पुरवठा करता यावा म्हणून महेश अर्बन सहकारी बँक स्थापन करून आज तिचे उत्तम कामकाज सुरु आहे. मतदार संघातील शेतकरी, कष्टकरी यांना जोड व्यवसायातून रोख



रक्कम प्राप्त व्हावी म्हणून उजना येथे दूध संकलन केंद्र सुरु करण्यात आले आहे. गरजूना महेश बँकेकडून वित्तीय सहाय्य करून दुग्ध उत्पादक पशुधन खरेदी करण्यास मदत करण्यात येते. व पुढे त्यांचे दूध खरेदी करून सिद्धी दूध संकलन केंद्रा मार्फत त्याची प्रक्रिया करून विक्री केली जाते. यामुळे अहमदपूर तालुक्यात धवलक्रांती होवून शेतकरी सुखी समाधानी झाला आहे.

बाबासाहेब पाटील २००९ मध्ये अहमदपूर चाकूर मतदार संघातून पहिल्यांदा निवडणुकीसाठी उभा राहिले होते, व त्यात त्यांनी विजयश्री प्राप्त केली होती. विधानसभेत त्यांनी प्रस्तुत मतदार संघांचे प्रतिनिधित्व करताना अनेक कल्याणकारी योजना हातात घेऊन त्याचे यशस्वीपणे निराकरण केले आहे. पहिल्या पंचवार्षिक सत्रात त्यांनी मन्याड नदीवरील उपसा सिंचन योजना हाती घेऊन ती पूर्णत्वास नेली. यामुळे पिण्याचे पाण्याचा प्रश्न सुटून सुमारे अडीच हजार एकर जमीन बागायती झाली आहे. २०१९ च्या दुसऱ्या सत्रात निवडून आल्यावर त्यांनी याच मन्याड नदीवरील आठ उच्च पातळी बंधा-याचा प्रश्न हाती घेतला असून, या योजनेचे लाभ अनेक शेतकरी व कास्तकार यांना मिळून सुमारे दहा हजार एकर जमिनीचे सिंचनाचा प्रश्न कायम स्वरूपी मिटणार आहे. याशिवाय त्यांनी मतदार संघातील रस्ते विकास, मानवी आरोग्य, विद्युतीकरण व कोविड महामारी निर्मूलनाचे कामी महत्वाचे योगदान दिले आहे. मतदार सुखी तर जनसेवा कृतार्थ हे ब्रीद मनात ठेवून त्यांनी अनेक कल्याणकारी योजना खेचून आणल्या व त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून त्या पूर्णत्वास नेल्या आहेत. त्यांचे मतदार संघातील बराचसा भाग दुष्काळी असल्याने त्यांनी प्रामुख्याने जल नियोजनावर भर देवून सातत्याने त्याचा पाठपुरावा केला आहे. भविष्यातही यासाठी त्यांचे मनात कांही महत्वाकांक्षी योजना असून त्यास मूर्त स्वरूप यावे म्हणून ते भगीरथ प्रयत्न करीत आहेत. गरजूची कामे केली अथवा त्यांना नौकरी उपलब्ध करून दिली तर ती खरीखुरी सेवा ठरत असते. परंतू विशिष्ट हेतू समोर ठेवून सेवा केली तर ती आप मतलबी सेवा ठरत असते. म्हणून बाबासाहेबांनी त्यांचे विविध आस्थापना व प्रकल्पात खोगिरभरती न करता प्रामाणिक सेवक तयार करून त्यांचे मार्फत सात्विक विचारांचा प्रसार सुरु केला आहे. साहेबांना मनुष्याची अचूक पारख असून त्यानी माणसं जोडताना ती विचारपूर्वक निरखून जवळ केली आहेत. त्यांचेकडे कै. प्रल्हादराव उपासे बेलुरकर यांच्यासारखे शेकडो इमानदार कार्यकर्ते असून त्यांचे माध्यमातून जे कांही विधायक व सकारात्मक विचार आहेत, ते सामान्य मतदारपर्यंत सहज पोचवू शकतात. मानवी जीवनात पाण्याचे अनन्य साधारण महत्व असून त्यामुळेच त्याला जल संजीवनी व जल देवता म्हणतात.पाण्याचे प्रत्येक थेंबात स्वर्ग निर्माण करण्याची ताकत आहे.पाण्याशिवाय शेती व कोणताही व्यवसाय करणे कठीण आहे.म्हणूनच बाबासाहेबानी अहमदपूर मतदार संघात आगामी काळात अंतेश्वर जल प्रकल्पाचे नियोजन केले आहे.गोदावरी नदीचे वाहून जाणारे दोन टी एम सी पाणी उचलून ते लिंबोटीत आणून ते अवर्षणप्रवण झरी सारख्या ठिकाणी आणून त्याचा सिंचनासाठी उपयोग केला जावू शकतो.व आमदार महोदय या प्रकल्पास मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रयत्नशील आहेत.चाकूर व अहमदपूर येथे ट्रॉमा केअर युनिट यावे म्हणून साहेबानी प्रयत्न केला होता.त्यास शिंदे फडणवीस व पवार सरकारने प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासाठी लागणारा करोडो रुपयांचा निधी देखील मंजूर करण्यासाठी मान्यता दिली आहे. याशिवाय चाकूर येथे मागासवर्गीय मुला मुलींचे वसतिगृह मंजूर झाले असून शासनाने त्यासाठी सुमारे एकोणतीस कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. बाबासाहेबांना मतदार संघातील सर्व शाळा संगणक साक्षर करावयाच्या असून त्यासाठी ते वाटेल ते करण्यास तयार आहेत.या संदर्भात त्यांनी तज्ञ शिक्षक व संस्था चालक यांचेशी प्रदीर्घ चर्चा करून कृती आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्रात सध्या शेती व्यापार व जोडधंदे यासाठी बारामती मॉडेल आदर्श मानले जाते.त्याचाच ध्यास घेऊन साहेबानी मतदार संघात बारामती मॉडेलचे बीजारोपण करण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्र देशात बाबासाहेब या नावाभोवती एक वेगळे वलय आहे.हे नाम धारण करणारे व्यक्ती अद्वितीय व नामांकित श्रेय नामावलीत समाविष्ट असतात. बाबासाहेब एक धार्मिक वृत्तीचे व अध्यात्मावर दृढ विश्वास ठेवणारे व्यक्ती आहेत. ते कुटुंबवत्सल,शिस्तीचे भोक्ते,परोपकारी व सेवाभाव जोपासणारे व्यक्ती असून त्यांचेवर माझ्यासारख्या नवख्या व्यक्तीस लेखन प्रपंच करण्याची इच्छा निर्माण होणे यातच त्यांचे व्यक्ती महात्म्य सामावले आहे.

बाबासाहेब मोहनराव पाटील यानी यापूर्वी दोन वेळा अहमदपूर विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व केले आहे.यावेळीही ते या भागातून बहुमताने निवडून येतील व त्यांचे नावावर 'त्रिवार' चा विक्रम नोंदला जाईल यात तिळमात्र शंका नाही.त्यांचे मतदार संघातील विकास काम,मतदारांशी असलेला थेट संपर्क व त्यांची असलेली स्वच्छ प्रतिमा या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत.त्यांचे मतदार संघात मी 'जागो भारत' व 'भारत विकास परिषदेच्या' माध्यमातून किनगाव,अधोरी, चाकूर ,अहमदपूर व चापोली परिसरात फिरून माहिती घेतली असता जनतेत त्यांचे कामकाजाबाबत अतिशय समाधानकारक प्रतिबिंब उमटलेले आहे. इतर उमेदवारांचे तुलनेत ते सुसंस्कृत व सरस ठरलेले असल्यामुळे त्यांना जनतेतून उत्तम प्रतिसाद मिळेल असे वाटते.

बाबासाहेब पाटील यांच्या विविध शैक्षणिक संस्था, महेश बँक, दूध संकलन केंद्र व साखर कारखाना यामुळे जनतेत त्यांचेबद्दल सहानुभूती आहे.तरीही सध्याचे गतिमान व कलंकित राजकारण लक्षात घेता प्रचारात व जनसंपर्कात कोणतीही उणीव राहणार नाही. याची दक्षता घ्यावी लागेल.मतदार संघात केलेली कामे सामान्य मतदारांना माहीत नसतात. त्यामुळे त्याची माहिती त्यांचे पर्यंत पोचणे आवश्यक असते. तसेच आगामी काळात ज्या कांही योजना आखलेल्या आहेत त्याबाबतही त्यांना अवगत केले तर त्यातून सकारात्मक निष्कर्ष प्राप्त होत असतात. त्यामुळे त्या दृष्टीने वाटचाल केली तर विजयश्री प्राप्त करणे सहज शक्य आहे. कांही व्यक्ती कोणत्या पक्षात आहेत हे जरी त्यांना ओळखण्याचे माध्यम असले तरी बाबसाहेबांसारखे स्वयंभू व्यक्तीमुळेच त्या पक्षाला महत्व प्राप्त झालेले असते हे देखील तितकेच खरे आहे. बाबासाहेब पाटील हे जनसेवेचा ध्यास व लोक कल्याणाचा हव्यास बाळगणारे नेते आहेत त्यामुळे ते यावेळीही बाजी मारतील असा आशावाद व्यक्त करून जेष्ठतेनुसार त्यांनाही काकाशी यांच्याप्रमाणे लाल दिव्याची गाडी मिळून मंत्री महोदय होण्याचा मान मिळून त्यांच्या सर्व इच्छा आकांक्षा फलद्रुप होवोत ही शिव चरणी प्रार्थना करतो.

**- प्रा.डॉ.के.एन.अंबाड, लातूर**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०८ * अंक २८ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४ * किंमत : २ रू.

# तुम्ही आमदार निवडून द्या; मी या मतदार संघाचं सोनं करीन- शरद पवार




परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना बहुमताने निवडून द्या, मी या मतदारसंघाचं सोने करून दाखवीन. या भागात मोठ्या प्रमाणावर उद्योग आणून तरुणांच्या हाताला काम मिळवून देऊ असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी परळी येथील मोंढा मैदानावर शनिवारी (दि.९) दुपारी झालेल्या प्रचाराच्या जाहीर सभेतून दिले.

आपल्या भाषणात श्री पवार यांनी परळीचे माजी आमदार कै.रघुनाथराव मुंडे, माजी नगराध्यक्षा राधाबाई बियानी यांच्या आठवणीला उजाळा दिला. परळीतील गुंडगिरीवरही त्यांनी आपल्या भाषणातून घणाघात केला.संकटकाळात ज्यांना मदत केली, नेतृत्व निर्माण करण्यासाठी विरोधी पक्षनेता केले, मंत्रिमंडळात घेतले, त्यांनी पक्ष फोडण्यासाठी पुढाकार घेत बीड जिल्ह्याचा ऐक्याचा व पुरोगामित्वाचा आदर्श उध्वस्त केला, अशा व्यक्तींना सत्तेतून हद्दपार करा असे आवाहन श्री पवार यांनी केले. प्रास्ताविक युवक नेते सुनील गुट्टे यांनी केले.

व्यासपीठावर पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, राष्ट्रवादी काँग्रेस केंद्रीय महिला आघाडीच्या अध्यक्षा खासदार फौजिया खान, काँग्रेसच्या खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग सोनवणे, होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंहराजे होळकर, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, माकपचे नेते ॲड.अजय बुरांडे, राजेभाऊ फड, राजेश देशमुख, प्रभाकर वाघमोडे, बाळासाहेब देशमुख, आष्टी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार महबूब शेख, फुलचंद कराड, सुदामतीताई गुट्टे, वसंत मुंडे, सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुरभाई, देवराव लुगडे, ॲड.जीवनराव देशमुख, यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते तसेच सभेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

ज्येष्ठ नेते राजेश देशमुख यांनी यावेळी केलेल्या भाषणात परळीची जबाबदारी आम्ही समर्थपणे सांभाळून महाविकास आघाडीला या निवडणुकीत यश मिळवून देऊ असे सांगितले.

श्री होळकर महाविकास आघाडीच्या पाठीशी समर्थपणे उभे असे आवाहन केले. विद्यार्थी दशेपासून चळवळीत असणाऱ्या सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी धावून येणाऱ्या राजेसाहेब देशमुख यांना या निवडणुकीत यश मिळवून द्या असे आवाहन खा.रजनीताई पाटील यांनी यावेळी बोलतांना केले.

या निवडणुकीत महाविकास आघाडीला परळीत साथ द्या असे आवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी आपल्या भाषणात परळीतील गुंडगिरी, व्यापाऱ्यांना होणारा त्रास, विकासकामातील अपयश, पीकविम्यातील घोटाळा आदींबाबत महायुतीच्या नेत्यावर टिका करून या निवडणुकीत मला साथ द्या, मी परळीत शांतता, सुव्यवस्था नांदवण्यासाठी व येथील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. फौजिया खान, देवराव लुगडे, उत्तम माने व इतरांनी यावेळी विचार मांडले. सुत्रसंचालन करुन व आभार ॲड.माधव जाधव यांनी मानले. दरम्यान, या सभेनंतर श्री पवार यांनी पक्षाचे ज्येष्ठ नेते फुलचंदराव कराड यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी श्री कराड यांनी श्री पवार यांचे जोरदार स्वागत केले. ***




## आ.मुंडे यांच्या प्रचारासाठी परळीतून निघालेल्या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- कृषिमंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रचारासाठी महायुतीचे शहरातील सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते मैदानात उतरले असून आज सकाळच्या सात वाजल्यापासून दिवसभर माहितीच्या पदाधिकाऱ्यांनी परळी शहरातील विविध भागात घरोघर जाऊन नागरिकांच्या भेटी घेत धनंजय मुंडे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. या प्रचार फेरीस उत्स्फूर्त असा प्रतिसाद परळीकर नागरिकांनी दिल्याचे पाहायला मिळाले.

धनंजय मुंडे यांनी आम्हाला कोविड काळात मदत केली, धनंजय मुंडे यांनी आम्हाला घरकुल दिले, धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून आम्हाला वैद्यकीय मदत मिळाली, आमच्या घरात पाणी घुसले तेव्हा सर्वात आधी धनंजय मुंडे आमच्या मदतीला धावून आले, आमच्या सण उत्सवात, आमच्या सुख-दुःखात धनंजय मुंडे उपस्थित असतात, अशी अनेक कामे नागरिकच यावेळी पदाधिकाऱ्यांना सांगू लागले.

आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी शहर विकासाच्या पथावर असून याची प्रचिती प्रत्यक्ष नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. या प्रचार फेरीत सहभागी झालेल्या गुलाबी साडी परिधान केलेल्या महिला पदाधिकारी यांची संख्याही लक्षणीय होती.

आज या प्रचार फेरीच्या माध्यमातून परळी शहरातील बाजीप्रभू नगर, पंचवटी नगर, स्नेहनगर, जगमित्र हाऊसिंग सोसायटी, स्वाभिमान नगर, औद्योगिक वसाहत, पॉवरलूम, शास्त्रीनगर, शिवाजीनगर, माणिक नगर, जिव्हेश्वर नगर, तसेच सायंकाळच्या सत्रात महर्षी कणाद विद्यालय परिसर, अरुणोदय मार्केट, गुरुकृपा नगर, स्वाती नगर, परमार कॉलनी, जयनगर या भागात डोअर टू डोअर प्रचार करण्यात आला. या प्रचार फेरीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिवसेना व मित्रपक्ष महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शुक्रवारी सुद्धा ही प्रचार फेरी शहरातील उर्वरित भागात सुरू राहणार असल्याचे प्रचार समितीच्या वतीने कळवण्यात आले आहे. ***

# ज्येष्ठ नेते उत्तमराव माने यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



परळी वैजनाथ, (बातमीदार):- भारतीय जनता पक्षाच्या किसान सेलचे प्रदेश उपाध्यक्ष व ज्येष्ठ कामगार व शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

शनिवारी (दि.९) परळीत महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचाराच्या निमित्ताने श्री पवार यांची जाहीर सभा झाली. या सभेत श्री माने व त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. खासदार बजरंगबप्पा सोनवणे, राजेसाहेब देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना श्री माने यांनी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात का प्रवेश केला. याबाबत विचार मांडून परळीत शेतकरी, कष्टकरी, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी महाविकास आघाडीला बळ देण्यासाठी आपण पुढाकार घेवू, येथील महायुतीच्या नेत्याने व पालकमंत्र्याने शेतकरी, बेरोजगारांची फसवणूक केल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात केलेल्या प्रवेशाचे उपस्थितांनी स्वागत केले. उत्तम माने यांच्या प्रवेशामुळे परळी तालुक्यात पक्षाला बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. ***





'सा.परळी परिसर' चा

दिवाळी अंक

प्रसिद्ध झाला..!

वाचन पाना-पानांत...,
सा.परळी परिसर
सर्वांच्या मना-मनात...!

कथा, कविता, विविध विषयावरील वाचनीय लेख

संग्राह्य दिवाळी अंक...

अंकासाठी आमचे विक्रेते, एजंट यांच्याकडे आपली मागणी नोंदणी.

* अंकासाठी संपर्क : मो.९४२२३२८४९३ *